मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दि.१६ सप्टेंबर २०१७ रोजी युवा संसद ही कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी डॉ.नारायणराव गोटे हे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणुन मोक्षदा पाटील(जिल्हा पोलीस अधिक्षक, वाशिम.) हर्षदाताई देशमुख(अध्यक्ष जिल्हा परीषद, वाशिम.), रामकृष्ण कालापाड, पी.एस.खंडारे, आर.जे.देव(रेडीओ वत्सगुल्म,वाशिम.) व कार्यकारी प्राचार्य जी. एस.कुबडे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरूवात स्वामी विवेकानंद व संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमा पुजनाने झाली. आपल्या प्रास्ताविकामध्ये आर.जे.देव(रेडीओ वत्सगुल्म,वाशिम.) यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण वाढावेत तसेच युवकांच्या समस्या समोर याव्यात हा मुख्य उद्‌देश समोर ठेवून सदर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असल्याचे सांगितले. आपल्या मार्गदर्शनात मोक्षदा पाटील(जिल्हा पोलीस अधिक्षक, वाशिम.) यांनी विद्यार्थ्यांसोबत संवाद साधतांना असे म्हटले की, युवकच देशाची खरी शक्ती असून राष्ट्र उत्थानासाठी पुढे यावे असे आवाहन केले. हर्षदाताई देशमुख(अध्यक्ष जिल्हा परीषद, वाशिम.) यांनी मुलींच्या संदर्भाने प्रेरणापुरक असे मार्गदर्शन केले. पी.एस.खंडारे यांनी जादुचे अनेक प्रात्याक्षिक करून दाखवितांना समाजात भोंदुबाबा खोटे चमत्कार दाखवून जनतेला कसे फसवितात हे स्पष्ट केले. याप्रसंगी कार्यकारी प्राचार्य प्रा.जी.एस. कुबडे यांनी सुध्दा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आपल्या अध्यक्षीय मनोगतातून डॉ.नारायणराव गोटे यांनी विद्यार्थ्यांना संधीचे सोने करण्याची क्षमता प्रत्येकाने स्वतःमध्ये विकसीत करावी असे सुचविले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु.शिवानी गोदारा हिने केले तर आभार रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा.डी.आर.दामोदर यांनी मानले. याप्रसंगी महाविद्यालयाच्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसह बहुसंख्य विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

N.S.S. Programme Officer
Matoshri Shantabai Gote
College, Washim

Officiating Principal
Matoshri Shantabai Gote Arts
Com. & Sci.College,Washim




युवा संसद कार्यशाळेस मार्गदर्शन करतांना जिल्हा परिषद अध्यक्षा हर्षदा देशमुख.




अंधश्रद्धा निर्मुलन कार्यशाळेस मार्गदर्शन करतांना पी.एम. घांगरे व इतर मान्यवर.

N.S.S. Programme Officer
Matoshri Shantabai Gote

Officiating Principal
Matoshri Shantabai Gote Arts

वाशिम / रविवार, दि. १७ सप्टेंबर २०१७ देशोन्नती

# स्वयं रोजगार प्रशिक्षणाचा युवकांनी लाभ घ्यावा - देशमुख




शहर प्रतिनिधी / १६ सप्टेंबर

**वाशिम** : स्थानिक मातोश्री शांताबाई गोटे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात दिनांक १६ सप्टेंबर रोजी नेहरू युवा केंद्र वाशिम, राष्ट्रीय सेवा योजना व रोजगार, व स्पर्धा परीक्षा केंद्राच्यावतीने युवा संसद कार्यक्रमामध्ये जिल्हा परिषद अध्यक्षा हर्षदाताई देशमुख बोलत होत्या. त्यांनी युवकांना मार्गदर्शन करताना व्यसनांनपासून दूर राहावे तसेच, युवतींनी कोणत्याही प्रकारचे उपवास न करता स्वतःला सुदृढ ठेवण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या प्रथम सत्राचे उदघाटन करतांना मोक्षदा पाटील म्हणाल्या महिला व युवकांनी आत्मविश्वासाने पुढे येऊन स्वतःला कधीही कमजोर न समजता स्वतःचा विकास करावा व राष्ट्र उत्थानासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. नारायणराव गोटे होते तर, प्रमुख मार्गदर्शक म्हणून जिल्हा पोलीस अधीक्षक मोक्षदा पाटील, कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात जिल्हा परिषद अध्यक्षा हर्षदा ताई देशमुख, रामकृष्ण कालापाड, पी.एस खंडारे, देव इंगोले महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. जी. एस. कुबडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात स्वामी विवेकानंदांच्या प्रतिमा पूजनाने झाली. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामध्ये देव इंगोले यांनी सदर युवा संसद आयोजनामागील उद्देश स्पष्ट केला. आपल्या मनोगतातून मोक्षदा पाटील यांनी आजच्या युवकांसमोर स्पर्धा परीक्षा हाच सर्वोत्तम पर्याय आहे असेही सांगितले. सोबतच विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षासंदर्भात विचारलेल्या प्रश्नांचीही उत्तरे दिली. याप्रसंगी रामकृष्ण कालापाड यांनी अंधश्रद्धा समाजाला कशा घातक आहेत असे सांगितले. पी.एस खंडारे यांनी विविध चमत्कारिक प्रयोगातून अनेक भोंदू बाबा कशाप्रकारे समाजाला फसवितात हे सिद्ध केले. तसेच, समाजाने अशा भोंदू बाबांपासून दूर राहण्याचे आवाहन केले. आपल्या मनोगतातून प्राचार्य जी.एस. कुबडे यांनी देशासमोरील युवा शक्तीच भविष्य असल्याचे सांगितले. आपल्या अध्यक्षीय भाषणातून डॉ. नारायणराव गोटे यांनी युवकांनी आपल्यातील गुण कौशल्यांचा विकास अशा प्रकारच्या कार्यक्रमाच्या माध्यमातून करावा, असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नेहरू युवा केंद्राचे राष्ट्रीय युवा स्वयं सेवक राजेंद्र गायकवाड, आकाश काकडे, संदीप राऊत, निलेश अंभोरे यांनी परिश्रम घेतले तर कार्यक्रमाचे सूत्र संचालन कु. शिवानी गोदारा हिने केले तर, आभार प्रा. डी. आर. दामोदर यांनी मानले. कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच नेहरू युवा केंद्राचे पदाधिकारी व बहुसंख्य विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

N.S.S. Programme Officer
Matoshri Shantabai Gote
College Washim

Officiating Principal
Matoshri Shantabai Gote Arts
Com. & Sci.College,Washim

लोकमत अकोला, सोमवार, १८ सप्टेंबर २०१७ २

## मोक्षदा पाटील: नेहरु युवा केंद्राची तालुकास्तरीय युवा संसद उत्साहात

# युवकांनो, राष्ट्र उत्थानासाठी पुढे या!

लोकमत न्यूज नेटवर्क

वाशिम: आजच्या युवकांवर उद्याच्या उज्वल देशाचे भवितव्य असल्याने युवकांनी कुठल्याही चुकीच्या मार्गावर न लागता राष्ट्रउत्थानासाठी पुढे यायला हवे, असे प्रतिपादन जिल्हा पोलिस अधीक्षक मोक्षदा पाटील यांनी केले. स्थानिक मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालयात नेहरु युवा केंद्र, राष्ट्रीय सेवा योजना व रोजगार, स्पर्धा परीक्षा केंद्राच्या वतीने शनिवारी तालुकास्तरीय युवा संसद हा कार्यक्रम पार पडला. यावेळी त्या बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. नारायणराव गोटे होते. जिल्हा परिषद अध्यक्ष हर्षदा देशमुख, रामकृष्ण कालापाड, पी.एस खंदारे, देव इंगोले, महाविद्यालयाचे प्राचार्य जी.एस. कुबडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. प्रास्ताविकामध्ये इंगोले यांनी युवा संसद आयोजनामागील उद्देश स्पष्ट केला. याप्रसंगी पोलिस अधीक्षक पाटील यांनी आजच्या युवकांसमोर स्पर्धा परीक्षा हाच सर्वोत्तम पर्याय असल्याचे सांगून विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांसंदर्भात उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली. रामकृष्ण कालापाड यांनी अंधश्रद्धा समाजाला कशी घातक आहे, हे पटवून दिले. खंदारे यांनी विविध चमत्कारिक प्रयोगातून भोंदू बाबा कशाप्रकारे समाजाला फसवितात, हे प्रयोगातून सिद्ध केले. समाजाने भोंदू बाबांपासून सावधान राहण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नेहरु युवा केंद्राचे राष्ट्रीय युवा स्वयंसेवक शलेंद्र गायकवाड, आकाश काकडे, संदीप राऊत, निलेश अंभोरे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन शिवानी गोदारा हिने केले; तर आभार प्रा. डी.आर. दामोदर यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच नेहरु युवा केंद्राचे पदाधिकारी व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.



तालुकास्तरीय युवा संसदमध्ये मार्गदर्शन करताना पोलिस अधीक्षक पाटील.

N.S.S. Programme Officer
Matoshri Shantabai Gote
College Washim

Officiating Principal
Matoshri Shantabai Gote Arts
Com. & Sci.College,Washim

# राष्ट्र उत्थानासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा

## मोक्षदा पाटील : नेहरू युवा केंद्राची तालुकास्तरीय युवा संसद संपन्न

सकाळ वृत्तसेवा

वाशीम, ता. १६ : स्थानिक मातोश्री शांताबाई गोटे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शनिवारी (ता.१६) नेहरू युवा केंद्र वाशीम, राष्ट्रीय सेवा योजना व रोजगार व स्पर्धा परीक्षा केंद्राच्या वतीने युवा संसद कार्यक्रमामध्ये केले. या कार्यक्रमात बोलताना मोक्षदा पाटील म्हणाल्या, महिला व युवकांनी आत्मविश्वासाने पुढे येऊन स्वतःला कधीही कमजोर न समजता स्वतःचा विकास करावा असे सांगत राष्ट्र उत्थानासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. नारायण गोटे होते. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून जिल्हा पोलीस अधीक्षक मोक्षदा पाटील, कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात जिल्हा परिषद अध्यक्षा हर्षदा देशमुख, रामकृष्ण कालापाड, पी. एस. खंदारे, देव इंगोले महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. जी. एस. कुबडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात स्वामी विवेकानंदांच्या प्रतिमा पूजनाने झाली. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामध्ये देव इंगोले यांनी सदर युवा संसद आयोजनामागील उद्देश स्पष्ट केला. आपल्या मनोगतातून मोक्षदा पाटील यांनी आजच्या युवकांसमोर स्पर्धा परीक्षा हाच सर्वोत्तम पर्याय असे आवर्जून सांगितले. सोबतच विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षासंदर्भात विचारलेल्या प्रश्नांचीही उत्तरे दिली. यावेळी रामकृष्ण कालापाड यांनी अंधश्रद्धा समाजाला कशा घातक आहेत असे सांगितले. हर्षदाताई देशमुख यांनी सुद्धा युवकांनी जिल्हा परिषदेमार्फत दिल्या जाणाऱ्या विविध स्वयं रोजगार प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. पी. एस. खंदारे यांनी विविध चमत्कारिक प्रयोगातून अनेक भोंदूबाबा कसा प्रकारे समाजाला फसवितात हे सिद्ध केले. तसेच समाजाने अशा भोंदू बाबांपासून दूर राहण्याचे आवाहन केले. आपल्या मनोगतातून प्राचार्य जी.एस. कुबडे यांनी देशासमोरील युवा शक्तीच भविष्य असल्याचे सांगितले आपल्या अध्यक्षीय भाषणातून डॉ. नारायण गोटे यांनी युवकांनी आपल्यातील गुण कौशल्यांचा विकास अशा प्रकारच्या कार्यक्रमाच्या माध्यमातून करावा, असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नेहरू युवा केंद्राचे राष्ट्रीय युवा स्वयं सेवक राजेंद्र गायकवाड, आकाश काकडे, संदीप राऊत, निलेश अंभोरे यांनी परिश्रम घेतले. तर कार्यक्रमाचे सूत्र संचालन शिवानी गोदारा हिने केले. तर आभार प्रा. डी. आर. दामोदर यांनी मानले. कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच नेहरू युवा केंद्राचे पदाधिकारी व बहुसंख्य विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.



वाशीम : युवा संसद कार्यक्रमात बोलताना जिल्हा पोलिस अधीक्षक मोक्षदा पाटील व इतर मान्यवर.

सकाळ
४

N.S.S. Programme Officer
Matoshri Shantabai Gote College Washim

Officiating Principal
Matoshri Shantabai Gote Arts Com. & Sci.College,Washim

मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम.

राष्ट्रीय सेवा योजना नियमित शिबीरांतर्गत

# "स्वच्छता ही सेवा" रासेयो उद्‌बोधन वर्ग अहवाल

दि.24 सप्टेंबर 2017 स्थळ :– मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय,वाशिम.

मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने रविवार दि.२४ सप्टेंबर २०१७ रोजी राष्ट्रीय सेवा योजना दिनाच्या निमीत्याने स्वच्छता सेवा तथा रासेयो उद्‌बोधन वर्ग असा कार्यक्रम घेण्यात आला. त्यानिमीत्य आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री.संजय गोटे हे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणुन डॉ. वेदप्रकाश डोणगावकर, प्रा.डी.आर.दामोदर यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. प्रसंगी रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा.डी.आर.दामोदर यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये सदर कार्यक्रमाच्या आयोजनाचा उद्देश स्पष्ट केला. प्रमुख मार्गदर्शक म्हणुन उपस्थित असलेले डॉ.वेदप्रकाश डोणगावकर स्वच्छता हे भारतीय संस्कृतीचे एक महत्वपूर्ण अंग आहे असे सांगतांना स्वच्छता म्हणजे आपल्या संस्कृतीला जपणे हे प्रत्येकाचे नैतिक कर्तव्य आहे असे सांगितले. आपल्या अध्यक्षीय मनोगतात श्री.संजय गोटे यांनी स्वच्छता समृध्दी यांच्यातील सहसंबंध स्पष्ट केला. तसेच रासेयो पथकाने स्वच्छतेसाठी नेहमीच कटीबध्द असावे असे सांगितले. याप्रसंगी रासेयो पथकाने महाविद्यालय परीसर स्वच्छता केली. "स्वच्छता ही सेवा" या विषयावर निबंध व पोस्टर स्पर्धा सुध्दा घेण्यात आली.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अकाश कुवडे यांनी केले तर आभार अजय राजे यांनी मानले. याप्रसंगी बहुसंख्य रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते.

## स्वच्छता सेवा कार्यक्रम संख्यात्मक माहिती

| अ.क्र. | कार्यक्रमाचे नाव | सहभागी रासेयो स्वयंसेवक | | कामाचे तास | सहभागी शिक्षक |
|---|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | | |
| ०१ | स्वच्छता ही सेवा चर्चासत्र | ७८ | ५० | ०२ | ०३ |
| ०२ | महाविद्यालय परिसर स्वच्छता | ३० | १० | ०३ | ०३ |
| ०३ | पोस्टर स्पर्धा | ०३ | ०२ | .. | .. |
| ०४ | निबंध स्पर्धा | ०५ | ०४ | .. | .. |

N.S.S. Programme Office
Matoshri Shantabai Gote
College Washim

Officiating Principal
Matoshri Shantabai Gote Arts
Com. & Sci.College.Washim




रासेयो उद्बोधन वर्गास मार्गदर्शन करतांना रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. डी. आर. दामोदर




स्वच्छता चर्चासत्रात मनोगत व्यक्त करतांना रासेयो स्वयंसेवक आकाश कुबडे

N.S.S. Programme Officer
Matoshri Shantabai Gote

Officiating Principal
Matoshri Shantabai Gote Arts
... College Washim

मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम

राष्ट्रीय सेवा योजना

नियमीत शिबीर अंतर्गत

# रोजगार मार्गदर्शन कार्यशाळा अहवाल

दि.१३ नोव्हें.२०१७

स्थळ : मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय, वाशिम

---

मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना पथक व जिल्हा कौशल्य विकास कार्यालय, वाशिमच्या वतीने रोजगार व कौशल्य विकास मार्गदर्शन मेळावा दि. १३ नोव्हे. २०१७ रोजी घेण्यात आला.

सदर मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष डॉ.नारायणराव गोटे हे होते. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणुन जिल्हा कौशल्य विकास कार्यालय, वाशिमचे अ.सं.ठाकरे, कार्यकारी प्राचार्य डॉ.जी.एस.कुबडे हे होते. या मेळाव्यासाठी औरंगाबाद येथील लॉकसेफ मल्टीसर्व्हीसेस प्रा.लि., ध्रुत ट्रान्समिशन, पुणे, नवभारत फर्टीलायझर, नागपूर, आणि वाशिम येथील एल.आय.सी.कार्यालय यांनी सहभाग घेतला होता. या प्रसंगी एकुण ७२२ उमेदवारांनी मुलाखती दिल्या. यापैकी २४४ उमेदवारांची रोजगारासाठी प्राथमिक निवड करण्यात आली. याप्रसंगी कार्यशाळेचे अध्यक्ष डॉ. नारायणराव गोटे यांनी योग्य प्रमाणातील रोजगाराशिवाय देशाचा विकास शक्य नाही असे मत मांडले. प्रमुख मार्गदर्शक म्हणुन उपस्थित असलेले जिल्हा कौशल्य विकास कार्यालय, वाशिमचे अ.सं.ठाकरे यांनी सुध्दा विद्यार्थ्यांना रोजगारासाठी भविष्यातील संधी यासंबंधी सखोल असे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री.भोडसे सर यांनी केले तर आभार प्रदर्शन रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा.दिपक दामोदर यांनी केले.

N.S.S. Programme Officer
Matoshri Shantabai Gote
College Washim

Officiating Principal
Matoshri Shantabai Gote Arts
Com. & Sci.College,Washim

लोकमत अकोला मंगळवार, २१ नोव्हेंबर २०१७ २



रोजगार मेळाव्याला उपस्थित मान्यवर.

# २४४ बेरोजगारांना मिळाला रोजगार!

लोकमत न्यूज नेटवर्क

वाशिम: जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांकरिता जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या वतीने मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालयात सोमवारी रोजगार व कौशल्य विकास मार्गदर्शन मेळावा पार पडला. यात २४४ उमेदवारांची प्राथमिक स्वरुपात निवड करण्यात आली.

यावेळी गोटे महाविद्यालयाचे अध्यक्ष डॉ. नारायण गोटे, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे अ. सं. ठाकरे, प्राचार्य डॉ. जी.एस. कुबडे उपस्थित होते. बेरोजगार युवकांनी कुटुंबाची आर्थिक स्थिती सुधारण्यास हातभार लावावा, असे आवाहन यावेळी अ.सं.ठाकरे यांनी केले.

N.S.S. Programme Officer
Matoshri Shantabai Gote
College Washim

Officiating Principal
Matoshri Shantabai Gote Arts
Com. & Sci.College,Washim

शेतकऱ्यांच्या प्रश्नावर राष्ट्रवादीच
एल्गार

अपंगाचे जन आक्रोश आंदोलन

# वाशिम Live

देशोन्नती मंगळवार, दि

## थोडक्यात

**.एड इंग्रजी विषयाचे
.क मार्गदर्शन**

.शिम : शिवाजी अध्यापक .याच्या वतीने डिटीएड द्वितीय .. इं.. विषयाचे येणाऱ्या २३ .च्या परिक्षेसाठी इंग्रजी विषयाची .ी तयारी व निशुल्क इंग्रजी .च्या सराव पेपर बाबतची तयारी . येणार आहे. तयारी व .साठी विद्यार्थ्यांनी शिवाजी .क विद्यालय वाशिम येथे यावे असे .न अध्यापक विद्यालयाचे तर्फे .ात आले आहे. याचा फायदा .इ इंग्रजी विषयामध्ये अनुत्तीर्ण .या माजी विद्यार्थ्यांनी घ्यावा असे .चे प्राचार्य विकास रोकडे यांनी केले

**.ार्वजनिक स्वच्छतागृहाची .ी**

.रेधोरा : गावात सार्वजनिक .तागृह नसल्याकारणाने गावातील .ा मंडळींना स्वच्छतागृहासाठी .ट ... असल्याने गावात .तागृ... उभारणी करण्यात यावी, .मागणी रिधोरा गावातील महिलांनी पंचायतीकडे केली आहे.

# रोजगार मेळाव्यातून २४४ उमेदवारांची

## वाशिम येथे रोजगार मेळावा संपन्न

शहर प्रतिनिधी / २० नोव्हेंबर

वाशिम : जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांकरिता जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी रोजगार व कौशल्य विकास मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये २४४ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली.

यावेळी मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान विद्यालयाचे अध्यक्ष डॉ. नारायण गोटे, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे अ. सं. ठाकरे, प्राचार्य डॉ. जी. एस. कुबडे आदी उपस्थित होते.

मेळाव्यामध्ये औरंगाबाद येथील लॉकलेफ मल्टीसर्व्हीसेस प्रा. लि., धूत ट्रान्समिशन, पुणे येथील एस. आय. एस. इंडिया प्रा. लि., नागपूर येथील नवभारत फर्टिलायझर्स प्रा. लि. आणि वाशिम येथील एस.आय.सी. कार्यालय आदी उद्योजक सहभागी झाले होते. यावेळी ७२२ उमेदवारांनी उपस्थित राहून मुलाखती दिल्या. यापैकी २४४ उमेदवारांची रोजगारासाठी प्राथमिक निवड करण्यात आली आहे. कार्यक्रमाचे



वाशिम येथील रोजगार मेळाव्यास उपस्थित मान्यवर

**युवकांना ...
करून दे...**

प्रास्ताि... बेरोजगार ... संधी उपल... रोजगार ... करण्यात अ... जास्तीत ज... उपलब्ध कर... माध्यमातून ... घेऊन युव... आर्थिक स्थि... लावावा. ... उपस्थितां...

सूत्रसंचालन... आभार प्रद... कार्यक्रम ... विकास, ... मार्गदर्शन ... कला, ... महाविद्याल... घेतले.

N.S.S. Programme Office
Matoshri Shantabai Gote
College Washim

Officiating Principal
Matoshri Shantabai Gote Arts
Com. & Sci.College,Washim

मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम.

## राष्ट्रीय सेवा योजना नियमित शिबीरांतर्गत

# नवीन गुंतवणूकदारांसाठी आर्थिक नियोजन कार्यशाळा अहवाल

दि.24फेब्रु.2018 स्थळ :– मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय,वाशिम.

मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम येथे भारतीय प्रतिभूती विनीमय बोर्ड व राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दि.२४.०२.२०१८ रोजी वित्तीय साक्षरता कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य प्रा.जी. एस.कुबडे हे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणुन शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय, अकोला येथील डॉ.प्रशांत पिसोळकर यांची उपस्थिती होती.

आपल्या प्रास्ताविकामध्ये रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा.डी.आर.दामोदर यांनी महाविद्यालयीन विद्यार्थी हे भविष्यातील नवगुंतवणूकदार आहेत त्यांच्यात आर्थिक साक्षरता वाढवी हा मुख्य उददेश समोर ठेवून सदर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असल्याचे सांगितले. आपल्या मार्गदर्शनात डॉ.प्रशांत पिसोळकर यांनी कोणत्या क्षेत्रात पैसा गुंतणुकीला प्राध्यान्य दिले पाहिजे हे सांगतांना. उत्पन्न तसेच पैशाचा विनीयोग या संदर्भात सुध्दा सखोल असे मार्गदर्शन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. डिजीटल पेमेंट या संदर्भात सुध्दा विवीध उदाहरणे दिली. आपल्या अध्यक्षीय मनोगतातून कार्यकारी प्राचार्य प्रा.जी.एस.कुबडे यांनी विद्यार्थ्यांनी वित्तीय साक्षरता संबंधीचे ज्ञान समाजात प्रसारीत केले पाहिजे असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ.बी.आर.तनपुरे यांनी केले तर आभार रासेयो विद्यार्थी प्रतिनिधी अजय राजे यांनी मानले. याप्रसंगी महाविद्यालयाच्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसह बहुसंख्य विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

N.S.S. Programme Officer
Matoshri Shantabai Gote
College Washim

Officiating Principal
Matoshri Shantabai Gote Arts
Com. & Sci.College,Washim

लोकमत अकोला गुरुवार, १ मार्च २०१८ ३

# वित्तीय साक्षरता कार्यशाळा उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

वाशिम : स्थानिक मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात भारतीय प्रतिभूती आणि विनिमय बोर्ड व महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने दि. २४ फेब्रुवारी रोजी वित्तीय साक्षरता मार्गदर्शन कार्यशाळा पार पडली.

या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी.एस.कुबडे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ.प्रशांत पिसोळकर होते. यावेळी संजय गोटे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. पिसोळकर यांनी आर्थिक नियोजन, गुंतवणूकीबाबत माहिती दिली.

N.S.S. Programme Officer
Matoshri Shantabai Gote
College Washim

Officiating Principal
Matoshri Shantabai Gote Arts
Com. & Sci.College,Washim

**Dr. Prashant M. Pisolkar**
M. Com., M. Phil., B.Ed., Ph.D.
Asst. Professor & Head Dept. of Commerce,
**SEBI Empanelled Financial Education Resource Person**

Shankarlal Khandelwal College
Godbole Plots, Old City, Akola (M.S.)
Ph./Fax.: (0724) 2425508
Email: aklkrupa@dataone.in

"Malai", Uttara Colony, Behind Patil Market,
Umari Road, **Akola - 444005** (M.S.)
Ph.: Ph.: (0724) 2491956, (M): 9423428127
Email: pmpisolkar@gmail.com

प्रति,
मा. प्राचार्य,

मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

विषय :- आपले कृतज्ञतापूर्व आभार प्रगट करणे बाबत . . .

महोदय,

**सर्वप्रथम आपले कृतज्ञतापूर्वक आभार.** आर्थिक साक्षरता अभियान अंतर्गत समाजाच्या विविध स्तरातील लोकांमध्ये आर्थिक शिक्षण व जागृती निर्माण करण्यासाठी SEBI च्या माध्यमातुन आर्थिक शिक्षण व जागृती कार्यशाळेचे आयोजन चार जिल्हायांमध्ये करण्याचे दायित्व माझ्यावर सोपविण्यात आले. विषयाची मनापासून आवड व जीवनामध्ये त्याचे महत्व जाणुन मी हे दायित्व आनंदाने स्विकारले. या माध्यमातुन आपणासारख्या प्रज्ञावंत शिक्षकांच्या व नामांकीत महाविद्यालयाच्या सान्निध्यात थोडा वेळ का होईना येता येईल, विचारांचे, कृतीचे आदान प्रदान करता येईल हा या मागील उददेश. आपण व आपल्या महाविद्यालयाने भरभरुन सहकार्य केलंत. हा माझ्या जीवनासाठी आनंदाचा व प्रेरणेचा ठेवा आहे.

आज आपला भारत परिवर्तनाच्या उंबरठयावर उभा आहे. आपल्या देशाने आर्थिक क्रांतीचं पाऊल उचललं आहे. एक पारदर्शी आर्थिक व्यवहारांची साक्षरता विद्यार्थ्यांमध्ये व त्याद्वारे लोकांमध्ये निर्माण करण्याचे अभियान SEBI ने सुरु केले होतेच, आपल्या महाविद्यालयात कार्यशाळेचे आयोजन करुन आपण सुध्दा या चळवळीची एक महत्वपूर्ण कडी बनुन ही आर्थिक साक्षरतेची चळवळ अखंडपणे सुरु ठेवली, याबददल आपले अभिनंदन.

दि. ८ नोव्हेंबर रोजी आपल्या देशात अर्थक्रांतीची पहाट उगवली. महाविद्यालयांमधून सुरु केलेली आर्थिक साक्षरतेची चळवळ संपूर्ण देशात सुरु झाली. समाजाच्या दृष्टीने एका महत्वाच्या विषयात हातभार लावता आला याचं समाधान व आनंद मिळाला, याचं संपूर्ण श्रेय आपलं आहे हे विनम्रपणे व्यक्त करतो.

ही कार्यशाळा घेण्यासाठी आपण केलेलं सहकार्य अनमोल आहे, आपल्या महाविद्यालयातील संबधीत शिक्षक व कर्मचारी वर्गाने अत्यंत प्रेमपूर्वक व आपलेपणातुन सहकार्य केलं. याकरीता मी आपला कायम ऋणी आहे. या उपक्रमाच्या निमित्याने आपणाशी व आपल्या महाविद्यालयाशी झालेला स्नेहबंध ही माझ्यासाठी अमूल्य ठेव आहे.

या. .....आपण सर्व मिळुन आर्थिक साक्षरतेची ज्योत मनामनात जागविण्याचा संकल्प घेवू या, व या परिवर्तनाच्या यात्रेचे सहयात्री बनू या. आपल्या महाविद्यालयातील सर्व घटकांचे व विद्यार्थ्यांचे पुन:श्च धन्यवाद. आपले विशेष धन्यवाद.

धन्यवाद

डॉ. प्रशांत म. पिसोळकर

(M) 9423428127

SEBI "Certified Financial Resource Person"

Proforma-C

# Matoshri Shantabai Gote Arts Commerce & Science College

Tq. **Washim** Dist. **Washim** (M.S.)

Certificate from the leader / head of the target group/investor association

(On the letter head / plain letter with stamp of the institute)

**Date: 24/02/2018**

To,

The Deputy General Manager/Assistant General Manager/Manager

Investor Awareness Division,

HO/RO/LO,

Securities and Exchange Board of India

**Dear Sir/Madam,**

This is to certify that **Dr. Prashant M. Pisolkar** with RP No. **SEBI/RP/HO/MH/242** has acted as speaker / faculty at a workshop organized for "**Financial Planning for Young Investors**" on 24th Feb. 2018 at 2.15 PM at **Matoshri Shantabai Gote Arts Commerce & Science College, Washim** was attended by of participants. In the said workshop study material was distributed to participants, free of cost.

Yours faithfully,

Signature of Head of Institute: Officiating Principal Matoshri Shantabai Gote Arts Com. & Sci. College, Washim

Name of Head of Institute: **Prof. G.S. Kubade**

Designation of Head of Institute: **Officiating Principal**

Contact details of Head of Institute: **9921544962**

मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम

राष्ट्रीय सेवा योजना

नियमीत शिबीर अंतर्गत

# रक्तदान शिबीर अहवाल

दि.०९ मार्च २०१८ स्थळ : मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय, वाशिम

---

मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना पथकच्या वतीने दि.०९ मार्च २०१८ रोजी रक्तदान शिबीर घेण्यात आले. त्यानिमीत्य आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थाध्यक्ष डॉ.नारायणराव गोटे हे होते. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणुन डॉ.डेनियल लाड व कार्यकारी प्राचार्य डॉ.जी.एस.कुबडे हे होते.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा.दिपक दामोदर यांनी केले. आपल्या मार्गदर्शनामध्ये कार्यकारी प्राचार्य डॉ.जी.एस.कुबडे यांनी रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान कसे आहे हे समजावून सांगितले: आपल्या अध्यक्षीय मनोगतात डॉ. नारायणराव गोटे यांनी सामाजिक बांधिलकी म्हणुन महाविद्यालयीन युवकांनी रक्तदान करण्याचे आवाहन केले. याप्रसंगी प्रा.सोहेल अहमद, प्रा.भारत पट्टेबहादुर, राहुल सुरेकार, मो.नाझीम, वजाहत अली खान, अमोल इंगोले, आकाश लोलप, दिपक महाजन, पवन काकपुरे, अभिजीत डोंगरे, नदीम नंदावाले, धनराज राठोड, श्रीकीसन जटाळे, अमीत चव्हाण, अक्षय नकले, श्रीकीसन चवाळे, हर्षवर्धन पाईकराव, अजय राजे अशा एकुण २० रक्तदात्यांनी रक्तदान केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अभिजीत डोंगरे तर आभार परमेश्वर गाभणे याने माानले.

N.S.S. Programme Officer
Matoshri Shantabai Gote
College Washim

Officiating Principal
Matoshri Shantabai Gote Arts
Com. & Sci.College,Washim

लोकमत समाचार
अकोला, रविवार, 11 मार्च 2018 2

# गोटे महाविद्यालय में रक्तदान शिविर

वाशिम। 10 मार्च। लोस सेवा

स्थानीय मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य एवं विज्ञान महाविद्यालय में 9 मार्च को राष्ट्रीय सेवा योजना पथक की ओर से रक्तदान शिविर का आयोजन किया गया. इस समय आयोजित कार्यक्रम की अध्यक्षता डॉ. नारायणराव गोटे ने की. कार्यक्रम में प्रमुख मार्गदर्शक के रूप में डॉ.डैनियन लाड, संदेश राठोड़, महाविद्यालय के कार्यकारी प्राचार्य डॉ.जी.एस. कुचड़े प्रमुखता से उपस्थित थे.

इस समय कार्यक्रम की प्रस्तावना करते हुए रासेयो कार्यक्रम के अधिकारी प्रा.दीपक दामोदर ने शिविर के आयोजन का उद्देश्य बताया. पश्चात डॉ.डैनियन लाड, कार्यकारी प्राचार्य डॉ. जी.एस. कुचड़े ने रक्तदान के महत्व पर प्रकाश डालते हुए इसे सर्वश्रेष्ठ दान करार दिया.

अंत में अध्यक्षीय संबोधन करते हुए डॉ.नारायणराव गोटे ने सामाजिक उत्तरदायित्व मानते हुए महाविद्यालय के छात्रों से रक्तदान शिविर में भाग ले कर रक्तदान करने की अपील विद्यार्थियों से की.




रक्तदान करते महाविद्यालय के छात्र.

इस समय प्रा.सोहेल अहमद, प्रा. भारत पट्टेबहादुर, राहुल सुरकर, मोहम्मद नाजिम, वजाहत अली खान, अमोल इंगोले, आकाश लोलप, दीपक महाजन, पवन काकपुर, अभिजीत डोंगरे, नदीम नंदावाले, धनराज राठोड़, श्रीकिसन जटाले, अमित चव्हाण, अक्षय नवाले, शिवचरण चवाले, हनुमान चवाले, तुफान दुबे, हर्षवर्धन पाईकराव तथा अजय राजे को मिला कर कुल 20 विद्यार्थियों ने रक्तदान किया. संचालन अभिजीत डोंगरे ने, जबकि आभार परमेश्वर गाभणे ने माना. कार्यक्रम की सफलता के लिए शिक्षक एवं शिक्षकेतर कर्मचारियों के अतिरिक्त रासेयो स्वयंसेवकों ने परिश्रम किया.

N.S.S. Programme Officer
Matoshri Shantabai Gote
College Washim

Officiating Principal
Matoshri Shantabai Gote Arts
Comm. & Sci.College, Washim

देशोन्नती रविवार, दि. २५ मार्च २०१८

# मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालयात रक्तदान शिबीर




*तालुका प्रतिनिधी* / २४ मार्च

**वाशिम :** स्थानिक, मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाशिम येथे ९ मार्च २०१८ रोजी राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्यावतीने रक्तदान शिबीर घेण्यात आले. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी डॉ. नारायणराव गोटे हे होते. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. डेनियन लाड, संदेश राठोड, महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. जी. एस. कुबडे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविकामध्ये रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. दीपक दामोदर यांनी सादर शिबिराच्या आयोजनाचा उद्देश स्पष्ट केला. यानंतर डॉ. डेनियन लाड, कार्यकारी प्राचार्य डॉ. जी. एस. कुबडे यांनी रक्तदानाचे महत्व तथा रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान कसे आहे, हे स्पष्ट केले. आपल्या अध्यक्षीय मनोगतात डॉ. नारायणराव गोटे यांनी सामाजिक बांधिलकी म्हणून महाविद्यालयीन युवकांनी रक्तदानामध्ये स्वयंस्फूर्तीने सहभागी होण्याचे आवाहन केले. याप्रसंगी प्रा. सोहेल अहेमद, प्रा. भारत पट्टेबहादूर, राहुल सुरेकर, मोहम्मद नाजीम, राजहत अली खान, अमोल इंगोले, आकाश लोलप, दीपक महाजन, पवन काकपूर, अभिजित डोंगरे, नदीम नंदावाले, धनराज राठोड, श्रीकिसन उराडे, अमित चव्हाण, अक्षय नवले, शिवचरण बवाळे, हनुमान बवाळे, तुफान डुबे, हर्षवर्धन पाईकराव, अजय राजे अशा एकूण २० विद्यार्थी तथा प्राध्यापकांनी रक्तदान केले. कार्यक्रमाचे संचालन अभिजित डोंगरे यांनी केले तर आभार परमेश्वर गामणे यांनी मानले. याप्रसंगी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या मार्गदर्शनात बहुसंख्य रासेयो स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

N.S.S. Programme Office
Matoshri Shantabai Gote College Washim

Officiating Principal
Matoshri Shantabai Gote Arts Com. & Sci.College,Washim